सोमवार
दि. १४ ऑगस्ट २०२३
मुल्य २ /- रूपये
पृष्ठ ४
वर्ष ६ वे अंक ३३

Postal Reg. No : G2/47/CHA-304/2022-23

मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com RNI. MAHMAR/2018/77866 संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

Scan QR code to visit ... Epaper Portal

# पत्रकारितेत सामाजिक बांधिलकी महत्वाची

## सह्याद्रीचा राखणदार साप्ताहिक कार्यालयाचे उद्‌घाटन प्रसंगी कॅबिनेट मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांचे प्रतिपादन





**गडचिरोली / प्रतिनिधी**

योग्य माहिती सर्व दूर पोहोचणे हे विकास प्रक्रियेसाठी आवश्यक असते. ती गरज पत्रकारिता पूर्ण करते. त्यामुळे पत्रकारितेत सामाजिक बांधिलकी जोपासली गेली पाहिजे असे प्रतिपादन राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी केले.सह्याद्रीचा राखणदार या साप्ताहिक कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.यावेळी सामाजिक कार्यकर्ते बबलू हकीम,राष्ट्रवादी महिला काँग्रेसचे नागपूर विभागीय अध्यक्ष तथा गडचिरोली जिल्हाध्यक्ष शाहीन हकीम, सह्याद्रीचा राखणदार साप्ताहिकाचे मुख्य संपादक मारोती नारायण घुमे,सामाजिक कार्यकर्ते अरुण मुक्कावार,सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर व्ही बी बोम्मावार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.तर प्रमुख पाहुणे म्हणून साई बोम्मावार, फहिम भाई काजी, राष्ट्रवादी काँग्रेसचे अहेरी तालुका अध्यक्ष श्रीनिवास विरगोनवार,ग्रा प सदस्य मल्लारेड्डी बोम्मावार, राष्ट्रवादी महिला काँग्रेसचे अहेरी विधानसभा अध्यक्ष ज्ञानकुमारी कौशी,अहेरी तालुका अध्यक्ष सारिका गडपल्लीवार,अहेरी शहर अध्यक्ष सुवर्णा पुसालवार, रा.म.कॉ चे जिल्हा सरचिटणीस जयश्री चिलवेलवार, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष स्वप्नील श्रीरामवार, सूरज माडुरवार, सूरज घुमे, नागेपल्ली येथील प्रतिष्टीत नागरिक कांचनलाल वासनिक, गणेश दुर्गे, अशोक रापेल्लीवार, अमोल रापेल्लीवार, आलापल्ली व्यापारी संघटनेचे अध्यक्ष चांद्रकिशोर पांडे, सुमित मोतकुरवार, शुभम चिंतावार आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना लोकं स्थानिक भाषांमध्ये बातम्या वाचणे, ऐकणे अधिक पसंत करतात. स्थानिक भाषेतील पत्रकारिता ही मातीशी जुळलेली असते. ग्रामीण भागातील प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम भाषिक माध्यमे अधिक चांगल्या पद्धतीने करतात. माध्यमांवर लोकजागृतीची महत्त्वाची जबाबदारी आहे. ती त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे.

■ शाहीन हकीम यांनी आपल्या मार्गदर्शनात गडचिरोली हा नक्षलग्रस्त आणि आदिवासीबहुल जिल्हा म्हणून ओळखला जातो. क्षेत्रफळाच्या दृष्टिकोनातून गडचिरोली जिल्हा हा खूप मोठा आहे. सर्वच वृत्तपत्रांचे कार्यालय जिल्हा मुख्यालयातच आहेत.आलापल्ली व अहेरी सारख्या परिसरात असे कार्यालय आवश्यक असून पहिल्यांदाच सह्याद्रीचा राखणदार साप्ताहिकाचा माध्यमातून कार्यालय मिळालं आहे.विशेष म्हणजे वेब पोर्टल, युट्युब आणि साप्ताहिक पेपर असल्याने सर्वच माध्यमातून विविध बातम्या वाचायला आणि बघायला मिळणार आहे.या भागात कार्यालय उघडणे आणि काम करणे म्हणजे एकप्रकारचे आव्हानच आहे.तरीही हे धाडस सह्याद्रीचा राखणदार या सप्ताहिक ने करून दाखविले असून या भागातील नागरिकांसाठी आनंदाची बाब असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

विश्वासार्हता जपण्यासाठी माध्यमांनी वस्तूनिष्ठतेचे गांभीर्य जपले पाहिजे, असेही ते म्हणाले.

सामाजिक कार्यकर्ते बबलू हकीम यांनी डिजिटल माध्यमाने गेल्या दोन दशकांत अभूतपूर्व प्रगती केली आहे.

डिजिटल माध्यमातून बातम्या तातडीने वाचकापर्यंत पोहोचतात. परिणामी वाचकांचाही ओढा डिजिटल माध्यमातून वाढतो आहे वाचकांना एका क्लिकवर तात्काळ बातम्या मिळत असल्याने वृत्तपत्र संकेतस्थळांना ही महत्त्व प्राप्त झाले आहे.सह्याद्रीचा राखणदार साप्ताहिक, पोर्टल, युट्युब चॅनल च्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम होणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सह्याद्रीचा राखणदार साप्ताहिक कार्यालय उदघाटनाचे प्रास्ताविक संपादक आशिष घुमे तर आभार गडचिरोली जिल्हा आवृत्तीचे संपादक महेश गुंडेटीवार तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक आनंद अलोने यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा प्रतिनिधी आनंद दहागावकर आणि संदीप येमनूरवार यांनी परिश्रम घेतले.




































# १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले होते आणि पुढील वर्षी याच दिवशी म्हणजे १५ ऑगस्ट १९४८ रोजी या दिवसाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला त्यावर्षी भारताला स्वातंत्र्य मिळून पूर्ण एक वर्ष झाले होते. या आधारावर, यंदा २०२३ मध्ये, भारत ७६ वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहे आणि भारताने स्वातंत्र्याला ७६ वर्षे पूर्ण केली आहेत. सर्वत्र स्वातंत्र्य दिनाची तयारीही सुरू झाली आहे. यंदाच्या स्वातंत्र्य दिनाची थीम 'राष्ट्र प्रथम, नेहमीच प्रथम' (नेशन फर्स्ट, ऑल्वेज फर्स्ट') अशी आहे.

इंग्रजांच्या शेकडो वर्षांच्या गुलामगिरीतून भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. मात्र, १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिवस साजरा करणारा भारत हा एकमेव देश नाही. भारताव्यतिरिक्त असे अन्य ५ देश आहेत जे १५ ऑगस्ट रोजी आपला स्वातंत्र्यदिन साजरा करतात. या देशांनाही १५ ऑगस्ट रोजीच स्वातंत्र्य मिळालं होतं. भारताव्यतिरिक्त दक्षिण कोरियाही या दिवशी आपला स्वातंत्र्य दिन साजरा करतो. यापूर्वी हा देश जपानच्या ताब्यात होता, मात्र १५ ऑगस्ट १९४५ रोजी हा देश स्वतंत्र झाला. उत्तर कोरियाही १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करतो. हा देशही पूर्वी जपानच्या ताब्यात होता. दक्षिण कोरियाच्या स्वातंत्र्यानंतर उत्तर कोरियाही स्वतंत्र झाले.डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कांगोने १५ ऑगस्ट १९६० रोजी फ्रेंच राज्यकर्त्यांपासून पूर्ण स्वातंत्र्य मिळवले. हा देश मध्य आफ्रिकन प्रदेशात येतो. हे १८८० मध्ये फ्रेंच राज्यकर्त्यांनी गुलाम बनवले होते. प्रथम हा देश फ्रेंच कांगो म्हणून ओळखला जात होता. नंतर १९०३ मध्ये मध्य कांगो म्हणून ओळखला जात होता. स्वातंत्र्यानंतर, फुलबर्ट यूलू हे देशाचे पहिले राष्ट्रपती झाले आणि त्यांनी १९६३ पर्यंत या पदी कायम होते. बहरीन १५ ऑगस्ट १९७१ रोजी स्वतंत्र झाले. बहारीनवर ब्रिटनचा ताबा होता. या दिवशी बहरीनचा शासक इसा बिन सलमान अल खलिफा याची बहरीनच्या प्रमुख पदाची निवड झाली.जगातील सर्वात लहान देशांपैकी एक असलेल्या लिकटेंस्टीनला १८६६ मध्ये जर्मन राज्यकर्त्यांपासून स्वातंत्र्य मिळाले. मात्र १५ ऑगस्ट हा राष्ट्रीय दिन १९४० पासून साजरा करण्यास सुरुवात झाली. या दिवशी संपूर्ण देशात सुट्टी असते. ५ ऑगस्ट १९४० रोजी, लिकटेंस्टीनच्या प्रिन्सिपॅलिटीच्या सरकारने अधिकृतपणे १५ ऑगस्ट हा देशाचा राष्ट्रीय दिवस म्हणून घोषित केला.

## भारतातलं एक असं ठिकाण जिथं स्वातंत्र्यदिन १९ दिवस आधीच साजरा केला जातो

देशभरात स्वातंत्र्यदिन (१५ ऑगस्ट) मोठ्या उत्साहात साजरा करण्याची तयारी सध्या सुरू आहे. १९४७ मध्ये १५ ऑगस्टलाच देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला आणि या दिवसापासून दरवर्षी १५ ऑगस्टला देशभरात स्वातंत्र्यदिन साजरा केला जातो, पण मध्य प्रदेशात एक अशी जागा आहे जिथे स्वातंत्र्यदिन काही दिवस आधीच साजरा केला जातो.हे ठिकाण आहे मंदसौरचे पशुपतीनाथ मंदिर, जिथे स्वातंत्र्यदिन तिथीनुसार साजरा केला जातो. परंपरेनुसार १९ दिवस अगोदर पशुपतीनाथ मंदिरात दुर्वा अभिषेक करून स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. मंदिराचे पुजारी कैलाश भट्ट सांगतात की, श्रावण महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या चतुर्दशीला भारताला स्वातंत्र्य मिळालं. म्हणूनच जुन्या मान्यतेनुसार, भगवान पशुपतीनाथांचा दुर्वा अभिषेक करून तिथीनुसार स्वातंत्र्यदिन साजरा केला जात असे.इथे स्वातंत्र्य दिन मोठ्या सणासारखा साजरा केला जातो. कोविड-१९ च्या काळामध्ये स्वातंत्र्य दिन फक्त पाच पुरोहितांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला होता. तर गेल्या वर्षी बाबा भोलेनाथांसोबत पूर्वीपेक्षा जास्त भाविक सामील झाले आणि स्वातंत्र्यदिन साजरा केला.

# बदलती क्रीडा संस्कृती

भली मोठी लाल मातीची मैदाने उघड्या पायांनी तुडवत, त्यात डोक्यावरचे कडक ऊन झेलत, घामाने चिंब झालेल्या मुलांचा क्रिकेटचा रंगलेला सामना असो किंवा पावसाळ्यात मजा म्हणून समुद्रकिनाऱ्यांवर फुटबॉल, हॉकीचा आनंद घेणारी मुलं-मुली आणि मातीचे डाग अंगावर मिरवत मैदानी खेळ खेळणारी शाळकरी पोरं वा कॉलेजकुमार, ही आजवरची क्रीडा संस्कृती. या प्रचलित नैसर्गिक मातीच्या मैदानांपलीकडे अलीकडच्या काही वर्षांत टर्फ संस्कृतीने हातपाय पसरायला सुरुवात केली आहे. इमारतीकरणात मैदानांचा घसा आवळून ती आकसायला लागली आहेत. त्याबरोबर ही टर्फची मैदाने तरुणांना आकर्षित करत आहेत. ट्रेनमधून येता-जाता अशी मैदाने नजरेस पडतात, तेव्हा विचार येतो, भविष्यात सेवा देणारे शहर अशी ख्याती मिरवणारी मुंबई आणि त्या लगतच्या उपनगरीय शहरांत क्रीडा संस्कृती स्थित्यंतरातून तर जात नाही ना?

मातीच्या मैदानांसह टर्फही गजबजू लागले आहेत. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसह ऑफिसेसमध्ये काम करणाऱ्या नोकरदार वर्गासाठी टर्फ ही मैदान संस्कृती सोयीची ठरत आहे. ऑफिसेसमधील डिपार्टमेंट मॅचेससाठी टर्फ उत्तम पर्याय ठरत आहे. जमिनीलगत गवताची चादर, सोयीनुसार कमी-अधिक आकाराचे, चारही बाजूंनी नेटने झाकोळलेले अशा मिनी मैदानाला टर्फ असे म्हटले जाते. या टर्फमध्ये जवळपास रात्री ११ वाजेपर्यंत खेळण्याची सोय असते. त्यामुळे ऑफिस कर्मचाऱ्यांसाठी काम संपवून खेळणे सोयीस्कर ठरते. या मैदानाबाहेर बॉल जाण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे या छोटेखानी; परंतु आकर्षक अशा मैदानात वेगळीच मजा असते. येथे क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, रग्बी असे आवडीनुसार खेळ खेळले जातात. विविध क्लब किंवा इंग्रजी शाळांच्या लगत अवतीभवती झाडांनी वेढलेल्या हिरव्यागार वातावरणात ही टर्फची मिनी आकर्षक मैदाने लक्ष वेधून घेतात. खासगी कार्यालयांतर्गत कर्मचाऱ्यांच्या स्पर्धांसाठी टर्फ हा उत्तम पर्याय आहे. अलीकडच्या काळात अनेक कंपन्यांकडून असे टर्फ दिवसभरासाठी बुक करून त्यात विविध खेळ खेळले जातात. त्यात महिलाही सहभागी होतात.

दुसरीकडे कबड्डीसारख्या मैदानी खेळात हल्ली सर्रास मॅटचा वापर होतो. पूर्वी केवळ मातीत बॉडी आणि शॉट्सवर खेळला जाणारा हा गरिबांचा खेळ आता चकचकीत शूज घालून मॅटवर खेळला जात आहे. कबड्डीच नाही, तर फुटबॉलसारखा मैदानी खेळही मॅटवर खेळला जात आहे. क्रीडा संस्कृती स्थित्यंतरातून जात असल्याचा हा दाखला आहे. क्रिकेट, कबड्डी, फुटबॉल हे खेळ आता फक्त मातीच्या मैदानांपुरते मर्यादित राहिले नाहीत, तर ते टर्फ ते मॅटच्या खेळपट्टीवर खेळले जात आहेत.

टर्फच्या खेळपट्ट्या स्वस्त आणि मस्त असल्या तरी त्या हौशी लोकांसाठी जास्त उपयुक्त आहेत. पण प्रोफेशनल क्रिकेट खेळू पाहणाऱ्या मुला-मुलींनी ते टाळलेलेच बरे. पण जर एखाद्याला उत्तम खेळाडू म्हणून घडायचे असेल, तर त्याने जास्तीत जास्त प्रॅक्टिस टर्फ पिचपेक्षा मातीच्या अर्थात सॉइल (दग्त) पिचवरच करावी. कारण, टर्फवर चेंडू जास्त उसळी घेतो. बॅटवर लगेच येतो. त्यामुळे खेळायला मजा येत असली तरी प्रत्यक्षात जेव्हा स्पर्धा होतात, तेव्हा त्यामुळे फ्रंट फूटवर खेळणे त्यांना अवघड जाते. कारण त्याची प्रॅक्टिस टर्फवर होतच नाही.

या टर्फबद्दल आणि एक गोष्ट लक्षात घेण्याजोगी झाल्यास पावसाळ्यात अशा पिचवर खेळणे फायद्याचे ठरते. कारण मुलांच्या खेळावर परिणाम होत नाही. त्यांचा सराव थांबत नाही. मातीची खेळपट्टी उपलब्ध नसल्यास पावसाळ्यापुरते या खेळपट्टीवर खेळण्यास हरकत नाही; परंतु पावसाळ्यासाठी टर्फप्रमाणे सॉइल म्हणजे मातीचे पिच बनवून घेता येतात. पण टर्फच्या तुलनेत सॉइल पिचेसचा मेंटेनन्स खूप असतो. म्हणून क्लब असो वा शाळा वगैरे या संस्थाही टर्फची पिच वापरणे जास्त सोयीचे समजतात. कारण खर्च कमी आणि सांभाळायला पण सोपी. टर्फचे मैदान एक झाडू मारला की झाले पूर्वीसारखे; परंतु मातीच्या खेळपट्टीचा मेंटेनन्स जास्त. त्यामुळे खासकरून पावसाळ्यासाठी क्वचितच मातीच्या खेळपट्ट्या बनवून घेतल्या जातात. कल्याणमध्ये पावसाळ्यासाठी एकाच ठिकाणी परवडणाऱ्या दरात अशी मातीची पिच उपलब्ध आहे आणि त्यानंतर ठाणे, मुंबई अशा ठिकाणी येथील मुलांना जावे लागते. त्यामुळे लांब कुठे जाण्यापेक्षा जवळचे टर्फ बरे अशी अवस्था आहे. मुंबई असो किंवा लगतची शहरे या ठिकठिकाणी तुलनेने स्वस्त टर्फचा वाढता वापर याला कारणीभूत आहे.

क्रिकेट असो वा फुटबॉल, रग्बी आणि हॉकी या सर्व मैदानी खेळांमध्ये टर्फ आणि नैसर्गिक मातीच्या खेळपट्टीचे फायदे आणि तोटे दिसतात. ते असे की, गवताच्या खेळपट्ट्या नैसर्गिक गवताने बनलेल्या असतात, जे कृत्रिम टर्फपेक्षा मऊ पृष्ठभाग प्रदान करतात. यामुळे दुखापतीचा धोका कमी होऊ शकतो, विशेषतः रग्बी आणि फुटबॉलसारख्या खेळांमध्ये. याउलट कृत्रिम टर्फ नैसर्गिक गवतापेक्षा कठीण आणि कमी मऊ असू शकते, ज्यामुळे इजा होण्याचा धोका जास्त असतो. तसेच गवताच्या खेळपट्ट्या सामान्यतः कृत्रिम टर्फपेक्षा अधिक चांगले कर्षण प्रदान करतात, ज्यामुळे खेळाडू लवकर आणि अधिक सहजतेने दिशा बदलू शकतात. शिवाय गवताच्या खेळपट्ट्या कृत्रिम टर्फपेक्षा थंड असतात, ज्या विशेषतः उष्ण हवामानात फायदेशीर ठरू शकतात. त्याउलट ऊबदार हवामानात कृत्रिम टर्फ खूप गरम होऊ शकते.

गवताच्या खेळपट्टीवर खेळण्याचे तोटे असे की, त्या हवामानावर अवलंबून असतात. ओल्या हवामानात या मातीच्या खेळपट्ट्या चिखलाच्या आणि न खेळण्यायोग्य होऊ शकतात, ज्यामुळे सामने रद्द किंवा पुढे ढकलले जाऊ शकतात. पण याउलट कृत्रिम टर्फच्या खेळपट्ट्या कोणत्याही हवामानात वापरल्या जाऊ शकतात. ज्यामुळे त्या भरपूर पाऊस किंवा बर्फ असलेल्या ठिकाणांसाठी आदर्श ठरतात. गवताच्या खेळपट्ट्यांना चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी नियमित देखभाल करणे आवश्यक आहे, जसे की पेरणी, पाणी देणे आणि खत देणे. तसेच गवताच्या खेळपट्ट्या कालांतराने असमान होऊ शकतात, ज्यामुळे चेंडू उसळू शकतो किंवा अप्रत्यशितपणे रोल करू शकतो. पण कृत्रिम टर्फ खेळपट्ट्या गवताच्या खेळपट्ट्यांपेक्षा जास्त टिकाऊ असतात पण त्यावर चेंडू नैसर्गिक गवतापेक्षा कृत्रिम टर्फवर जास्त उसळू शकतो, ज्यामुळे तो नियंत्रित करणे कठीण होऊ शकते.



आजपर्यंत आपण सातत्याने पाहत आलो की आपला बळीराजा शेतकरी सतत कर्जात डुबलेला असल्यामुळे, शासनाचे कोणतेही निश्चित ध्येयधोरण, उपाययोजना नसल्याने मृत्यूला कवटाळत आहे. जी काही ध्येय-धोरणं, तजवीज या आत्महत्या थांबविण्यासाठी केली जात असतात ती वेळेत आणि अपेक्षित प्रमाणात न मिळाल्यामुळे नैराश्य, कौटुंबिक जबाबदाऱ्या, गहाण पडलेल्या शेत जमिनी, सावकारांचा तगादा, कोठूनही घेतलेल्या कर्जाचे थकलेले हप्ते यामुळे हतबल होऊन अनेक शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. आजपर्यंत आपण आपल्या कृषी प्रधान देशात शेतकरी आत्महत्या थांवण्यात पूर्णपणे यशस्वी झालेलो नाही, हे आपलं दुर्दैव आहे. त्यातूनच आजमितीला सुशिक्षित चांगल्या कुटुंबातील, शिकले सवरलेले लोकं देखील केवळ डोईजड झालेल्या कर्जामुळे, खासगी सावकारांकडून भरमसाट व्याजाने पैसे घेऊन ते वेळेत न फेडू शकल्यामुळे, उधार उसणवारीचे प्रमाण फेडण्याच्या पलीकडे गेल्यामुळे आत्महत्या करत आहेत. वाढत्या आत्महत्यामागील बहुतांश कारणं जर पाहिलीत तर त्यात आर्थिक ओढाताण, कर्ज, उद्योग धंद्यात आलेले अपयश, आर्थिक नुकसान, तोटा, कर्ज वसुलीसाठी वापरली गेलेली अमानुष अपमानास्पद वागणूक, अर्वाच्य भाषा, शिवीगाळ यांसारखी कारणं मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

# शेतकरी आत्महत्या कधी थांबणार?

आपल्याला असलेली नियमित आर्थिक आवक, उत्पन्नाचे साधन, होणारा खर्च तसेच आपली आर्थिक परिस्थिती आणि कोणत्याही अचानक उद्भवलेल्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी आपण केलेली बचत अथवा तजवीज याचा ताळमेळ सगळ्यांनाच जमतोय असं नाही. दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई, पैसा मिळवण्यासाठी वापरले जाणारे शॉर्टकट, लवकरात लवकर श्रीमंत होण्यासाठी केलेले उलटे-पालटे व्यवहार यासारख्या सवयी आपल्या जीवावर उठत आहेत.

अनेक सर्वसामान्य कुटुंब नवीन घर, घराचं नूतनीकरण, नवी गाडी, छोट्या मोठ्या घरगुती वस्तू, फर्निचर, मुलांचं शिक्षण, लग्न यासाठी कर्ज घेतात. आपण प्रगती करावी, लवकरात लवकर सेटल व्हावे, आपल्या हक्काचं स्वमालकीचं सर्व काही आपल्याकडे असावं, आपल्याला उच्च राहणीमान उपभोगता यावं, समाजात आपल्याला पण मिरवता यावं या अपेक्षा ही स्वप्न पाहत असताना त्यासाठी भरपूर प्रयत्न, प्रामाणिक कष्ट सर्वसामान्य माणूस सातत्याने करत असतो. हे करणं गैर नाही, आपण महत्त्वाकांक्षी नक्कीच असावं पण त्यासाठी चुकीचे निर्णय, चुकीच्या लोकांकडून घेतलेली आर्थिक मदत आपल्या अंगलट येऊ शकते, याचेही भान जपणे आवश्यक आहे. आज-काल पती-पत्नी दोघेही कमावते असल्यामुळे कर्जाचे हफ्ते देखील व्यवस्थित फेडले जातात, अतिशय तरुण वयात स्वतःच सुसज्ज घर, गाडी घेऊन झपाट्याने ते भविष्याचे नियोजन करायला लागतात. पण काहींच्या बाबतीत हे शक्य होत नाही आणि आयुष्याची घडी विस्कटून जाते.

सगळ्यांनाच सर्व काही जमेल, सगळेच आर्थिक गणित आपल्या नियोजनानुसार जुळेल याबद्दल काहीच शाश्वती नसते. आपल्याला नोकरी अथवा व्यवसायामार्फत निश्चित स्वरूपात पगार अथवा इनकम असेल तर आपण कोणत्याही अधिकृत, कायदेशीर मार्गाने कर्ज घेऊ शकतो, ते परत फेडू शकतो. जर कोणत्याही अधिकृत ठिकाणांवरून कर्ज नाकारलं गेलं, आपण त्याच्या नियमात बसत नसलो, तर आपण खासगी सावकार, व्याजाने पैसे घेणे, सोनं तारण ठेवणे, अथवा इतर कोणतीही मौल्यवान वस्तू तारण ठेवून वाटेल त्या व्याज दराने पैसे उचलतो. भविष्यात काहीतरी तजवीज होईल, उत्पन्न मिळेल, कोणी नातेवाईक, मित्र मदत करेल या भाबड्या आशेवर आपण मोठी जोखीम स्वीकारतो. अशा अनधिकृत पद्धतीने घेतलेले पैसे व्याजाचे मीटर सुरू झाल्यावर प्रचंड त्रासदायक ठरतात. उसने अथवा व्याजाने पैसे घेऊन त्याचे व्याज वेळेत न भरल्यास लावला जाणारा तगादा आपली मानसिकता उद्विग्न करून टाकतो. व्याज अथवा मुद्दल वसूल करण्यासाठी वापरली जाणारी भाषा, दिल्या जाणाऱ्या धमक्या, मानसिक खच्चीकरण, बदनामीची भीती, घरातील बाई माणसाची पणाला लागलेली अब्रू कोणत्याही सर्वसामान्य घरातील, कुटुंबातील माणसाच्या सहनशक्तीच्या पलीकडे असते. अशा प्रकरणात केले जाणारे ब्लॅकमेल, सतत येणारे फोन, मेसेज, सातत्याने दारात येणारी माणसं, कर्जबाजारी पणामुळे समाजात होणारी मानहानी यामुळे सर्वसामान्य माणूस खचून जातो. एकाचं देणं मिटवायला दुसऱ्याकडून पैसे घेणं, परत त्याचं व्याज देणं, परत तो घेणेकरी डोक्यावर बसल्यावर तिसऱ्याकडून पैसे घेणं या चक्रामधून सहजासहजी बाहेर पडता येत नाही.

खासगी सावकार, अनधिकृत ठिकाणावरून भरमसाट व्याजदराने पैसे घेणे कोणत्याही सरळमार्गी, सर्वसामान्य नौकरदार अथवा मध्यमवर्गीय माणसाच्या हिताचे नाही. वास्तविक अशा बेकायदेशीर पद्धतीने पैसे घेऊन आपला जीव पणाला लावणे ही चूक कोणीच करता कामा नये. आपण कितीही सधन असलात, श्रीमंत असलात, पैसेवाले असलात तरीही अशा चुकीच्या लोकांना मोठं करण्यासाठी, त्यांची गुन्हेगारी वृत्ती वाढीस लागण्यासाठी, त्यांचं धाडस वाढण्यासाठी आपण कारणीभूत होणं योग्य नाही. चुकीच्या पद्धतीने पैसे व्याजाने देऊन त्याच्या कितीतरी पटीने ते वसूल करणारे, धाक, बळजबरी, दबाव या तंत्राचा वापर करून समाजात वावरणारे गुन्हेगार तोपर्यंत थांबणार नाहीत, जोपर्यंत आपण सर्व जण ही जीवघेणी सावकारकीची पद्धत बंद पाडणार नाही.

आपल्याला अशा पद्धतीने पैसे घ्यायला लागू नयेत आणि आत्महत्या करण्यापर्यंत आपल्यावर वेळ येऊ नये यासाठी आपण आपली आर्थिक परिस्थिती पूर्णपणे ओळखून असणे महत्त्वाचे आहे. आपल्या गरजा अत्यंत कमी ठेवणे, काटकसर करून राहणे, खोटा मोठेपणा, दिखाऊपणा याच्या आहारी जावून आपल्या कुवतीच्या बाहेर जावून कोणतेही आर्थिक व्यवहार न करणे, शक्यतो उधारी, कर्ज, उसणे पैसे घेणे यासारख्या त्रासदायक ठरणाऱ्या गोष्टींपासून लांब राहणे, स्वतःला तसेच कुटुंबाला आर्थिक शिस्त लावणे, योग्य व्यक्तींचा सल्ला घेऊनच कोणताही आर्थिक व्यवहार करणे, जे आहे, जशी परिस्थिती आहे त्यात तडजोड करण्याची सवय अंगीकरणे, घरातल्या लोकांना खोटी चुकीची मोठी स्वप्नं न दाखवणे, कोणतीही आर्थिक देणेदारी प्रामाणिकपणे वेळच्या वेळी परत करणे, उत्पन्नाचा आणि खर्चाचा विचारपूर्वक ताळमेळ घालणे, ज्या कामाचे पैसे त्याच कामाला वापरणे, इतरत्र ते खर्च होणार नाहीत याची काळजी घेणे, आपल्या आर्थिक परिस्थितीची लाज न बाळगता जसं आहे तसं वास्तवात जगणे, स्वतःच्या आर्थिक परिस्थितीची इतरांशी तुलना करून त्यात कमीपणा न मानणे, दुसऱ्याच्या जीवावर, दुसऱ्याच्या पैशांवर, घेतलेल्या पैशांवर स्वप्न रंगवून कोणाचा राग, रोष ओढून न घेणे, कोणतेही आर्थिक व्यवहार कायदेशीर, कागदोपत्री अधिकृत व्यक्तींना मध्यस्थी घेऊन करणे, आर्थिक अडचणींना खंबीरपणे सामोरं जाणे, कोणतीही पळवाट न शोधणे यांसारखी पथ्य पाळली, तर निश्चितच आपण सुखी-समाधानी आयुष्य जगू शकू.

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार



# प्रत्येक घरावर अभिमानाने फडकवा तिरंगा : ना.मुनगंटीवार



## ‘हर घर तिरंगा’ अभियानात सहभागी होण्याचे आवाहन, चंद्रपुरातील निवासस्थानी पालकमंत्री मुनगंटीवार यांनी केले ध्वजारोहण

### भारतीय अस्मितेचे प्रतीक

तिरंगा ध्वज हा केवळ चौकोनी कापडाचा तुकडा नसून भारतीय अस्मितेचे प्रतीक आहे. लाखो शहिदांनी प्राणांची आहुती दिल्यानंतर भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि त्यानंतर हा तिरंगा ध्वज हाती आला. या अभियानाच्या माध्यमातून सर्व शहिदांचे स्मरण करण्याची संधी देशवासीयांना मिळणार आहे.स्वातंत्र्यसैनिकांनी हसत हसत देशासाठी आपले प्राण अर्पण केले.स्वतः च्या परिवारापेक्षा माझा देश म्हणजेच माझा परिवार या भावनेने त्यांनी आपले आयुष्य भारत मातेच्या चरणी अर्पण केले. अश्या वीर शहिदांचे स्मरण करूया. २०४७ साली जेंव्हा स्वातंत्र्यदिनी तिरंगाचे ध्वजारोहण केले जाईल तेंव्हा या राष्ट्रध्वजाला जगाच्या कानाकोपऱ्यातून लोक वंदन करतील, त्यासाठी प्रत्येक दिवशी देशाला पुढे प्रगतीच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न करूया असेही ना.मुनगंटीवार म्हणाले.



**चंद्रपूर / प्रतिनिधी**
भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाची सांगता होत असून आपण आता शताब्दी महोत्सवाकडे वाटचाल करणार आहोत. अशात प्रत्येक घरावर अभिमानाने तिरंगा फडकवूया आणि ‘हर घर तिरंगा’ या अभियानाला चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे.
‘हर घर तिरंगा’ स्वातंत्र्याचा उत्सव १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने ना. मुनगंटीवार यांच्या चंद्रपूर येथील निवासस्थानी ध्वजारोहण केले . याप्रसंगी त्यांनी जनतेशी संवाद साधला. ते म्हणाले, १३ ते १५ ऑगस्ट या तीन दिवसांत राष्ट्रध्वजाचा संपूर्ण आदर राखत प्रत्येक घरावर तिरंगा दिमाखदारपणे फडकवावा. तिरंगा हा प्रत्येक भारतीयाची राष्ट्रीय अस्मिता आहे.’ अबाल वृद्धांमध्ये देशाभिमान जागृत राहावा यासाठी देशगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवापासून ‘हर घर तिरंगा’ अभियान सुरू केले. चंद्रपूर जिल्ह्यातून या अभियानाला यापूर्वी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.
यंदाही पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देत चंद्रपुरातील जनता ‘हर घर तिरंगा’ अभियानात सहभागी होईल, असा विश्वासही ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

# विवेकानंद ज्ञानपीठाचे सचिव अमन टेमुर्डे यांच्या हस्ते साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. शोभणे यांचा सत्कार

**भद्रावती/प्रतिनिधी**
९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अमळनेर येथे होऊ घातलेले आहे. या संमेलनाचे नियोजित अध्यक्ष म्हणून नागपूर येथील सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. रविंद्र शोभणे यांची निवड झालेली आहे. हे औचित्य साधून विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा या शैक्षणिक संस्थेचे सचिव अमन टेमुर्डे यांनी डॉ. शोभणे यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी गोंडवाना विद्यापीठातील वाणिज्य भाषा अभ्यास मंडळाचे



सदस्य डॉ. यशवंत घुमे व नागपूर येथील सी.पी. अँड बेरार महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. अजय कुलकर्णी उपस्थित होते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल टेमुर्डे यांनी नियोजित अध्यक्ष डॉ. रविंद्र शोभणे यांचा सत्कार केला. या भेटीत साहित्यविषयक विविध प्रकारच्या चर्चा झाल्या . यावेळी डॉ. शोभणे यांना महारोगी सेवा समिती वरोरा चे सचिव डॉ. विकास आमटे यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित झालेला गौरव ग्रंथ भेट देण्यात आला.

# तंत्रज्ञानाच्या युगातही ग्रंथालयाचे महत्त्व अनन्यसाधारण : डॉ. गिरीश सपाटे

## सी. पी. अँड बेरार महाविद्यालयात ग्रंथालय दिन

**नागपूर / प्रतिनिधी**
ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. रंगनाथन यांच्या जयंतीच्या निमित्ताने सी. पी. अँड बेरार महाविद्यालयाच्या ग्रंथालयात आयोजित कार्यक्रमात निमंत्रित वक्ता म्हणून बोलताना डॉ. गिरीश सपाटे म्हणाले की, आजचे युग हे नव तंत्रज्ञानाचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर दैनंदिन जीवनाचा भाग झाला असून ज्ञान मिळविण्यासाठी अनेक माध्यमे उपलब्ध असले तरी पुस्तकांचे महत्व कायम आहे. पुस्तक वाचण्याचा आनंद अवर्णनीय आहे त्यामुळे आजच्या विद्यार्थ्याने तंत्रज्ञानासोबतच



पुस्तक वाचनाचा छंद जोपासावा असे विचार व्यक्त केले. मुख्य अतिथी डॉ. प्रमोद फटिंग यांनी मानसिक आरोग्य उत्तम राहण्यासाठी वाचन हे महत्त्वाचे साधन असून आठवड्यातून एक दिवस ग्रंथालयाला भेट द्यावी. असे प्रतिपादन केले. डॉ. खोडे यांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद बारहाते होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. अजय कुळकर्णी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. विनोद डोंगरवार यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनात श्री बापू कांबळे यांचे सहकार्य लाभले.

# राज्याची दैनावस्था हे सरकारचे अपयश : विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार

## व्याहाड (खुर्द) येथे नागरी सत्कार - कार्यकर्त्यांकडून पुष्पवृष्टी, आतिषबाजी करून जल्लोष

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
राज्यात फोडाफोडीच्या राजकारणातून सत्ता स्थापन करून जनतेचा विश्वासघात करणारे सत्ता काबीज करताच जनतेला वाऱ्यावर सोडून दिले. राज्यात आज महागाई, बेरोजगारी, महापुरुषांचा अवमान, शेतकरी आत्महत्या अशा ज्वलंत समस्या उभ्या ठाकल्या असताना सरकार मात्र सत्तेच्या मदमस्तीत गुरफटून आहे. सरकारच्या अशा बेजबाबदार वागण्यामुळेच राज्याची दैनावस्था झालेली असून हे सरकारचे स्पेशल अपयश आहे .पक्षश्रेष्ठींनी मला विरोधी पक्षनेते पदी नेमून जी संधी दिली यातून जनसेवेकरिता सर्वतोपरी प्रामाणिक प्रयत्न करणार असे प्रतिपादन राज्याचे विरोधी पक्ष नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले ते सावली तालुक्यातील व्याहाड (खुर्द) येथे आयोजित भव्य नागरी सत्कार समारंभात सत्कारमूर्ती म्हणून बोलत होते.
विरोधी पक्ष नेते पदी नियुक्ती झाल्यानंतर माजी मंत्री तथा ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांचा स्थानिक मतदार संघातील व्याहाड (खुर्द) येथे प्रथम आगमना प्रित्यर्थ भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रामुख्याने नागपूर शिक्षक मतदार संघ आमदार सुधाकर अडबाले, माजी आ. डॉ .नामदेवराव उसेंडी, डॉ. नामदेव कीरसान, धनराज मुंगले,माजी जि प. उपाध्यक्ष संदीप गड्डमवार, माजी जि प. सभापती दिनेश चीटनूरवार, रोहित बोम्मावार, नरेशजी सुरमवार, राजेश सिद्धम, नितीन गोहने, रमाकांत लोधे ,स्वप्निल कावळे, सौ लता लाकडे, संदीप पुण्यपवार, उषाताई भोयर, सीमा सहारे, कवडूजी कुंदावार, विजय कोरेवार, राजू रेड्डी, निखिल सुरमवार, व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, महिला आघाडीच्या पदाधिकारी ,युवक काँग्रेसचे पदाधिकारी, तसेच अन्य मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.



यावेळी व्याहाड (खुर्द) येथे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचे आगमन होताच जेसीबीच्या साह्याने पुष्पवृष्टी करून फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. यानंतर मंचावरील उपस्थित मान्यवरांनी विरोधी पक्ष नेते आमदार विजय वडेट्टीवार यांच्या कर्तुत्वान व दमदार नेतृत्वाची गाथा उपस्थितांसमोर मांडली. आपल्या मनोगतात बोलताना विरोधी पक्ष नेते वडेट्टीवार म्हणाले की, जनतेने मला सदैव प्रेम दिले. तसेच आशीर्वादाच्या रूपातून एक सामान्य कार्यकर्ता ते राज्याचा विरोधी पक्ष नेता पदापर्यंत पोहोचविले. आज करण्यात आलेला हा बहुमान सत्कार जीवनातील एक अविस्मरणीय क्षण राहील असेही ते यावेळी म्हणाले.

सध्या राज्याच्या राजकीय स्थितीत संपूर्ण कलुशीतता आलेली असून कालपर्यंत विरोध करणारे आज सत्तेत मिसळून गुणगान गात आहे. महाराष्ट्रातील थोर महात्म्यांचा तसेच राष्ट्रपितांचा अवमान करणाऱ्यांना सरकारकडून मुभा मिळत असून राज्यात अनेक ज्वलंत समस्या उभ्या ठाकल्या आहेत. राज्यातील जनता ही त्रस्त झाली असताना घटलेला विकासदर, वाढलेली महागाई शेतकऱ्यांची हाल अपेष्टा यावर तोडगा काढण्यात सरकार स्पेशल अपयशी ठरत आहे. देश वाचवायचा असेल तर काँग्रेस एकमेव पर्याय असून महाविकास आघाडीच्या समर्थनात मैदानात उतरा असे आवाहन करत जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही अशी ग्वाही देखील दिली. व्याहाड (खुर्द) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निखिल सुरमवार व सहकाऱ्यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाची स्तुती करत हा जीवनातील अविस्मरणीय सत्कार असल्याचेही विरोधी पक्ष नेते आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले. आयोजित कार्यक्रमास सावली तालुक्यातील हजारोंच्या कार्यकर्ते उपस्थित होते.

# भीषण अपघातात एकाच परिवारातील तिघांचा मृत्यू

## भरधाव ट्रकने मोटारसायकला धडक; धोपटाळा पेट्रोल पंप जवळ अपघात

**राजुरा / प्रतिनिधी**
शहरालगत असलेल्या धोपटाला पेट्रोल पंप जवळ रात्री ८ वाजता राजुराकडून सास्तिकडे जाणाऱ्या भरधाव ट्रकने मोटारसायकलने आपल्या पत्नी व मुलीला घेऊन येणाऱ्या निलेश वैद्य (३२ वर्ष) रुपाली वैद्य (२६ वर्ष), मधू वैद्य (३ वर्ष) यांचा जोरदार धडक दिल्याने या अपघातात एकाच परिवारातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर याच ट्रकने समोर जाऊन प्रज्ञा प्रशाद टगराफ (३३ वर्ष) व प्रसाद राजाबाई टगराफ (४० वर्ष) दोन्ही रामपुर येथील यांना धडक दिल्याने दोघेही



जखमी आहे. जखमींना चंद्रपूर येथे उपचाराकरिता पाठविण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी पाहण्याकरिता गर्दी केली होती. सदर माहिती राजुरा पोलिसांना मिळताच घटनास्थळ गाठून गर्दी नियंत्रणात आणली.
प्राप्त माहितीनुसार धोपटाळा येथील गुरुदेव नगर येथे वास्तव्याने असलेला निलेश वैद्य हा मजुरी करून आपल्या परिवारासह वास्तव्याने राहत होता. सकाळी आपल्या पत्नी व मुलीसह बाहेरगावी कामानिमित्त गेले होते. सायंकाळी ते काम आटपून घरी येत असताना घरापासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर असलेल्या पेट्रोल पंप जवळ राजुरा कडून सास्तीकडे जाणाऱ्या ट्रकने मोटरसायकला धडक दिली धडक एवढी जोरदार होती की त्यात वैद्य परिवाराचा चकानाचुर झाला. तर समोर याच ट्रकने दोन मोटार सायकलस्वारांना धडक दिली यात रामपुर येथील दोघेही जखमी असून जखमींना राजुरा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता प्रकृती गंभीर असल्याने चंद्रपूर येथे पाठविण्यात आले. नागरिकांनी ट्रकचालक यांना पकडुन पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. समोरील तपास राजुरा पोलिस करीत आहे.

# लाखापुरच्या सरपंच चंद्रकला मेश्राम यांचा स्वातंत्र्यदिनी पंतप्रधानांच्या हस्ते होणार सत्कार

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाच्यावतीने जिल्हयातील ‘हर घर जल’ योजनेअंतर्गत चांगले काम केलेल्या व्यक्तींना लाल किल्ला, दिल्ली येथे स्वातंत्र्यदिनी १५ ऑगष्ट रोजीच्या समारंभाचे साक्षीदार होण्यासाठी विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. ब्रम्हपुरी तालुक्यातील लाखापुर येथील सरपंच चंद्रकला मेश्राम यांचा यात समावेश असून स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते श्रीमती मेश्राम यांचा सत्कार होणार आहे.
चंद्रपुर जिल्हयात जल जीवन मिशन अंतर्गत कामे सुरु आहेत. अनेक ठिकाणी कामे पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. काही ठिकाणी कामे पूर्ण झाली असून त्या गावात प्रत्येक घरी नळाव्दारे पाणी पोहचले आहे. जिल्हयातील अनेक गावे हर घर जल घोषित झालेली आहेत. अनेक ठिकाणी त्या गावातील सरपंच किंवा तेथील ग्रामपंचायत सदस्य समिती, स्वयं सहायता बचत गट यांनी चांगले काम केले आहे.
केंद्र शासनाने चंद्रपुर जिल्हयातील ब्रम्हपुरी तालुक्यातील लाखापुर येथील सरपंच चंद्रकला मेश्राम यांनी, जलजीवन मिशन योजनेमध्ये दिलेल्या योगदानाची दखल घेतली आहे. १५ ऑगष्ट रोजी दिल्ली येथे होणा-या समारंभाचे साक्षीदार होण्यासाठी सरपंच चंद्रकला मेश्राम आणी त्यांचे पती यांना उपस्थित राहण्याबाबतचे निमंत्रण केंद्र शासनाकडून देण्यात आले आहे. या कार्यक्रमाला चंद्रपुर जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) नुतन सावंत यांना महाराष्ट्र राज्याकडून या कार्यक्रमाचे नोडल अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे.
चंद्रकला मेश्राम यांच्या निवडीबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. चंद्रपुर जिल्हयातील महिला सरपंच यांचा देशाच्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्यावर सन्मान होणे, ही चंद्रपुर जिल्हयासाठी अभिमानाची बाब आहे. याच पावलावर पाऊल ठेवून इतरांनी प्रेरणा घ्यावी व गावाचा विकास साधावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

# हर घर तिरंगा उपक्रम उत्सव म्हणुन साजरा करा : आ. किशोर जोरगेवार

## चंद्रपूर येथील १०० तर घुग्घुस येथील ७५ फुट उंचीच्या तिरंगा झेंड्याचे आ. जोरगेवार यांच्या हस्ते लोकार्पण

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
अन्न, वस्त्र आणि निवारा यासह स्वांतत्र ही सुध्द मानवाची मूलभूत गरज आहे. शुरवीर क्रांतीकारकांच्या त्यागातून आपल्याला मिळालेले हे स्वातंत्र अबादीत ठेवत देशाला बलशाली बनविण्याचे काम स्वातंत्र देशातील नागरिक म्हणून आपल्या कडून झाले पाहिजे. हर घर तिरंगा उपक्रम देशात राबविल्या जात आहे. हा उपक्रम चंद्रपुरात उत्सव म्हणून प्रत्येक घरी साजरा झाला पाहिजे असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.
स्थानिक आमदार निधीतून आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर येथील पोलिस मुख्यालय येथे १०० फुट उंचीचा तर घूग्घूस येथील बस स्थानक येथे ७५ फुट उंचिचा तिरंगा झेंडा उभारला आहे. आज याचे लोकार्पण आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते



करण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, मनपा आयुक्त विपीन पालिवाल, एडीशनल पोलिस अधिक्षक विना जनबंधू, तहसिलदार विजय पवार, मनपा उपायुक्त अशोक गराटे, वन विभागाचे जितेंद्र रामगावकर, मंगेश खवले, यंग चांदा ब्रिगेडचे जिल्हा महानगर अध्यक्ष पंकज गुप्ता, महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, एस. टी महामंडळच्या जिल्हा नियंत्रक स्मिता सुतावणे, घुग्घूसचे पोलिस निरीक्षक आसिफ शेख, मधूकर मालेकर, कॉंग्रेस घुग्घूस शहर अध्यक्ष राजू रेड्डू, यंग चांदा ब्रिगेडचे इमरान शेख, उषा अगदारी, स्वप्नील वाढई, मुन्ना लोढे, नविन मोरे आदींची उपस्थिती होती.
यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, तिरंगा हा देशाची शान आहे. ऊर्जेचा स्त्रोत आहे. संपुर्ण देश वासियांना तिरंगा प्रती आदर आहे. त्यामुळे केंद्र सरकारने हर घर तिरंगा हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाला चंद्रपूरातही उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमा अंतर्गत महानगर पालिकेच्या वतीने तिरंगा वितरीत केल्या जाणार आहे. नागरिकांनी तो आपल्या घरी लावाला असे आवाहण यावेळी त्यांनी केले. राज्यातील प्रत्येक तालुक्यात ७५ ते १०० फुट उंचीचा राष्ट्रध्वज फडकविण्यात यावा अशी भुमिका राज्य सरकारची होती.
आपणही यासाठी आपल्या विधानसभा क्षेत्रात येणा-या घुग्घुस आणि चंद्रपूर येथे सदर उंचीचा राष्ट्रध्वज कायमस्वरूपी लहरत राहावा याकरिता निधी उपलब्ध करून दिला होता. याचे काम पुर्ण झाले आहे. आज याचे लोकार्पण पार पडले. आज पासुन येथे स्वातंत्र्याचा प्रतिक असलेला तिरंगा उभा राहणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

जगातील सर्वात चांगली लोकशाही व्यवस्था आपल्याला मिळाली आहे. याचे जतन आणि पालन करणे आपल्या सर्वांचे कत्यव्य आहे. आज येथे १०० फुट उंचिचा तिरंगा ध्वजाचे लोकार्पण झाले आहे. आता हे पवित्र स्थान झाले आहे. याचे पावित्र कायम राहिले पाहिजे. येथे असलेल्या भिंतीपण बोलक्या करण्यासाठी आपण निधी उपलब्ध करुन देणार असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन प्रा. श्याम हेडाऊ यांनी केले.

# १४ ऑगस्ट रोजी वनमंत्र्यांच्या हस्ते मोहर्ली निसर्ग पर्यटन गेट सुशोभीकरण भूमिपूजन सोहळा

## व्याघ्र गीताचे होणार लोकार्पण

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या मोहर्ली निसर्ग पर्यटन गेट सुशोभीकरणाचे भूमिपूजन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते १४ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता मोहर्ली गेट येथे होणार आहे.



चंद्रपूर जिल्ह्यात जगप्रसिद्ध ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प आहे. या प्रकल्पाला भेट देणाऱ्या एकूण पर्यटकांपैकी जवळपास ५० ते ६० टक्के पर्यटक मोहर्ली गेट मधून व्याघ्र सफारीचा आनंद लुटतात. देश - विदेशातील येणाऱ्या पर्यटकांसाठी निसर्गाच्या पर्यटनासोबतच गेटचे सुशोभीकरण असणे आवश्यक आहे. याच उद्देशाने मोहर्ली निसर्ग पर्यटन गेट सुशोभीकरणाचे भूमिपूजन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते १४ ऑगस्ट रोजी होत आहे. या सुशोभीकरणाअंतर्गत पर्यटकांसाठी वातानुकूलित प्रतीक्षालय, उपाहारगृह, व्याघ्र प्रकल्पाची माहिती देणारे केंद्र, भेटवस्तू विक्री केंद्र, पार्किंग व्यवस्था, तिकीट काउंटर आदींचा समावेश आहे.

### व्याघ्र गीताचे लोकार्पण

ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या, व्याघ्र गीताचे (मराठी रूप) लोकार्पण वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते होणार आहे. या गीताची संकल्पना टाइम्स ऑफ इंडिया ग्रुपची असून सदर गीत तनवीर गाजी यांनी लिहिले आहे. तर त्याला शंतनू मोइत्रा यांनी संगीतबद्ध केले आहे. या गीतासाठी छायाचित्रण, प्रसिद्ध दिग्दर्शक नल्ला मुथ्थू यांनी काढले आहे. विशेष म्हणजे या गीताचे सर्व शूटिंग ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पात झाल्याचे क्षेत्र संचालक तथा वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी कळविले आहे.

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
तसेच
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.अभिजीत मणियार
सिव्हील कॉन्ट्रॅक्टर, पद्मालया इंडस्ट्रीज वरोरा जि. चंद्रपूर

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
तसेच
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.अनिल झोटींग
माजी उपाध्यक्ष,
नगर परिषद वरोरा
श्री.आसिफ रजा
माजी अध्यक्ष
वरोरा – भद्रावती युथ कॉंग्रेस कमिटी

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
तसेच
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.हेमंत खापणे
सरचिटणीस जिल्हा कॉंग्रेस कमिटी

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
तसेच
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.सुधीर मुडेवार
सामाजिक कार्यकर्ता चंदनखेडा

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!
तसेच
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
राकेश आशिराम पून
नगरसेवक, नगर पंचायत गोंडपिपरी तथा
भाजपा युवा नेता , गोंडपिपरी

स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
तसेच
मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!
Paras Agro Processors
Paras Cotton Industries
Ginning Pressing & Oil Mill Unit
Amol Mutha
+91 9011036300
Prakash Mutha
+91 9881370111
- Regd. Office : Post Madheli, Tah. Warora
  Dist. Chandrapur (Maharashtra) INDIA
  Ph. 0716-286455, 286025, Fax : 286505
- Fact : 371/5 Marda Road, Warora,
  Dist. Chandrapur, (Maharashtra) INDIA

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
तसेच
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
आकाश गोपालराव वानखडे
जिल्हा उपाध्यक्ष, भाजयुमो, चंद्रपूर तथा
अध्यक्ष हनुमान व्यायाम शाळा, किलोनी

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
तसेच स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री. जितेंद्र मुथा
माढेळी ता. वरोरा

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.मनीष मु. जेठाणी
जिल्हा प्रमुख युवा सेना चंद्रपूर जिल्हा

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
तसेच
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.करण संजय देवतळे
प्रदेश सचिव भारतीय जनता युवा मोर्चा

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार
वर्धापन दिनाच्या
तसेच हार्दिक शुभेच्छा!
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.देवानंद महाजन
सरपंच, ग्राम पंचायत माढेळी ता. वरोरा

॥ स्वराज्य निर्माते ॥
मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!
तसेच
स्वातंत्र्य दिनाच्या
शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे
हार्दिक शुभेच्छा
श्री.मुकेश जिवतोडे
जिल्हा प्रमुख, चंद्रपूर

सह्याद्री चा राखणदार साप्ताहिक वृत्तपत्र मालक , प्रकाशक , संपादक आशीष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टिसव्हिसेस कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून मुद्रित करून मातृछायाभवन कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही. यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालयाअंतर्गत होईल.
A weekly newspaper `SAHYADRI CHA RAKHANDAR` printed by *Suraj Bhaktraj Ghume* ,sahyandri multiservices, karmveer ward , warora 442907 (M.H ) on behalf of Ashish Maroti Ghume owner, publisher & Editor of sahyadri cha rakhandar` matruchaya bhawan` , karmveer ward warora 442907(M.H) . the editer may not be agree with the published content . in case any objection , the content will be redressed under warora court RNI NO : MAHMAR/2018/77866
CONTACT NUMBER :- Ashish Ghume 9011708840, Suraj Ghume 9673560360 EMAIL :- sahyandrinews@gmail.com EPAPER :- epaper.sahyandrinews.com